**नोंदणी व मुद्रांक विभागाचे अधिनस्त एकूण ६०
आदर्श दुय्यम निबंधक कार्यालयांकरीता** (Model SRO Offices) **पदनिर्मिती करणेबाबत.**

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग

शासन निर्णय क्रमांक : आस्थाप-२०२६/२११/प्र.क्र.७३/मुद्रांक-१,

दालन क्र.म-7 अ, पोटमाळा, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय (विस्तार इमारत), मुंबई-400032.
दिनांक : ११ ऑगस्ट, २०२६.

वाचा : -१) म व व वि, शा.नि.क्रमांकः- मुद्रांक-२०२५/प्र.क्र.१२८/मुद्रांक-२, दिनांकः-९/१०/२०२५.

२)म व व वि, ज्ञापन क्रमांकः- मुद्रांक-२०२५/प्र.क्र.१२८/मुद्रांक-२, दिनांकः-१८/२/२०२६.

३) नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.का-४/प्र.क्र.८११/ २०२५/ २८८, दि.४/२/२०२६.

४) नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र.का-९/आस्था-४/ पदनिर्मीती/४४६/२०२६, दि.२३/२/२०२६.

प्रस्तावना :-

नोंदणी व मुद्रांक विभागात आदर्श दुय्यम निबंधक कार्यालयांची (Model SRO Offices) उभारणी व व्यवस्थापन करण्यासाठी ई-निविदा पध्दतीने खाजगी संस्थेची नियुक्ती करणेबाबत प्रस्तावास मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या १८२ व्या उच्चाधिकार समितीच्या बैठकीमध्ये मान्यता प्राप्त झाली. तद्नुषंगाने नोंदणी व मुद्रांक विभागात एकूण ६० आदर्श दुय्यम निबंधक कार्यालयांची (Model SRO Offices) उभारणी व व्यवस्थापन करण्यासाठी ई-निविदा पध्दतीने खाजगी संस्थेची नियुक्ती करणेबाबत व सदरचा प्रस्तावित खर्च स्वीय प्रपंची लेखा खात्यात (PLA) नागरिकांनी जमा केलेल्या प्रीमियम शुल्कातून (Premium charges) खर्च करण्यास संदर्भ क्र.१ येथील दि.९/१०/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता प्रदान करण्यात आलीआहे.

तसेच, तद्नुषंगाने नोंदणी व मुद्रांक विभागात एकूण ६० आदर्श दुय्यम निबंधक कार्यालयांची (Model SRO Offices) उभारणी व व्यवस्थापन करण्यासाठी ई-निविदा पध्दतीचा अवलंब करून लघुत्तम निविदाकार संस्था VFS Global Services Private Limited यांची पाच (५) वर्षे कालावधीसाठी नियुक्ती करण्यास संदर्भ क्र.२ येथील दि.१८/२/२०२६ रोजीच्या ज्ञापनान्वये शासन मान्यता प्राप्त झाली आहे.

प्रस्तुत प्रकरणी प्राप्त मान्यतेनुसार, प्रथम टप्प्यात मुंबई, ठाणे, पुणे, नागपूर, नाशिक व छत्रपती संभाजीनगर या जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी प्रस्तावित नवीन आदर्श दुय्यम निबंधक कार्यालयांचे नामाभिधानासह ३० नविन कार्यालये निर्माण करणे, सदर ३० कार्यालयांकरीता ६० पदे निर्माण करावयाचा प्रस्ताव वित्त विभागास सादर करण्यात आला आहे. तसेच, नोंदणी अधिनियम १९०८ चे कलम ७ नुसार राज्य शासनास असलेल्या अधिकारांतर्गत सदर ३० नवीन कार्यालय निर्मितीची अधिसूचना निर्गमित करण्यात येत आहे.

(कृ.मा.प.)

प्रस्तावित 30 नवीन आदर्श दुय्यम निबंधक कार्यालयांचे नामाभिधानासह ३० नविन कार्यालये निर्माण करून सदर कार्यालयातील सह दुय्यम निबंधक वर्ग-२ या संवर्गातील ३० पदे व वरिष्ठ लिपिक या संवर्गातील ३० पदे अशी एकूण ६० पदे निर्माण करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

नोंदणी व मुद्रांक विभागातील सर्व दुय्यम निबंधक कार्यालयांचे आधुनिकीकरण व अदययावतीकरण या अंतर्गत, प्रथम टप्प्यात मुंबई, ठाणे, पुणे, नागपूर, नाशिक व छत्रपती संभाजीनगर या जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी प्रस्तावित 30 नवीन आदर्श दुय्यम निबंधक (Model SRO Offices) कार्यालयांकरीता, सह दुय्यम निबंधक वर्ग-२ या संवर्गातील ३० पदे व वरिष्ठ लिपिक या संवर्गातील ३० पदे अशा एकूण ६० पद निर्मीती करण्यास उच्चस्तर समितीच्या मान्यतेच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्यांचा संकेतांक **२०२६०८१११८३८३२३९४८** असा आहे. सदर शासन निर्णय डिजिटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SATYANARAYAN SHIVPRASAD BAJAJ

Digitally signed by SATYANARAYAN SHIVPRASAD BAJAJ
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST DEPARTMENT, 2.5.4.20=559498df564ab1121a356349085c1b8e3cc0f12569ba0f7f2090386d4dccb333, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=F7145AF5949FB706E2DCB06C2B209B58FFA369F6E085E02041722C90F0528791, cn=SATYANARAYAN SHIVPRASAD BAJAJ
Date: 2026.08.11 19:02:22 +05'30'

(**सत्यनारायण एस. बजाज**)
सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति, नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक, महाराष्ट्र राज्य, पुणे.

प्रत, 1) अपर मुख्य सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक

2) उप सचिव (मुद्रांक), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक.

3) महालेखापाल 1/2 (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.

4) महालेखापाल 1/2 (लेखापरीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.

5) अपर मुद्रांक नियंत्रक, प्रधान मुद्रांक कार्यालय, मुंबई.

६) सर्व नोंदणी उपमहानिरीक्षक (नों. म. व मु.नि.मार्फत)

७) संबंधित जिल्हा कोषागार अधिकारी (नो.म. 1. व मु.नि. मार्फत)

८) संबंधित सर्व सह जिल्हा निबंधक वर्ग-1 (नो. म. न मु.नि. मार्फत)

९) वित्त विभाग (आपुक), मंत्रालय, मुंबई.

१०) निवडनस्ती, कार्यासन क्र.म-1, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई